# प्रकरण 1 आर्थिक भूगोलाची ओळख

## प्रस्तावना-

आर्थिक भूगोल ही मानवी भूगोलाची प्रमूख व महत्वाची शाखा आहे. या शाखेत मानवाच्या विविध आर्थिक क्रियांचा भौगोलीक द्रूष्टीकोनातून अभ्यास केला जातो. यामध्ये शिकार, मासेमारी ,पशुपालन, लाकुड कटाई,शेती खाणकाम इ. प्रमूख मानवी व्यवसायांचा समावेश होतो.

भूगोलशास्त्र हे भुपृष्टाचे शास्त्र असून त्याचा संबंध मानव व त्यांच्या कार्याशी आहे. या शास्त्राला प्रदिर्घ ऐतिहासिक परंपरा आहे. ऐतिहासिक काळातही मानवाला भुपृष्ठासंबंधी भरपुर माहिती होती. आधुनिक भूगोशास्त्र पृथ्वी यांचे परस्पर संबंधाचे विवेचन व विश्लेषण हे आधुनिक भूगोल शास्त्राचे उद्दिष्टे मानले जाते.

१.१ आर्थिक भूगोल व्याख्या. स्वरुप व व्याप्ती

**1. सेन गूप्ता-**

ज्या नैसर्गिक परिस्थितीचा मानवी व्यवसायावर परिणाम होतो त्यापरिणामाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे आर्थिक भूगोल होय.

**मॅकफरेल-**

या तज्ञाच्या मते ''आर्थिक भूगोल म्हणजे भौतिक परिस्थितीचे मानवाच्या आर्थिक कार्यावर होण्या-या परिणांमाचे अध्ययन होय''.

**3. प्रा. झिम्मरमन -**

या लेखकाच्या मते '' पर्यावरणाच्या अनुषंगाने मानवाच्या आर्थिक जिवनाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे आर्थिक भूगोल होय''.

**4. स्मिथ-**

'' भुपृष्ठाचा मानवाच्या व्यवसायावर परीणाम होतो त्यामुळे पर्वतीय, पठारी व मैदानी भागातील मानवी व्यवसायात भिन्नता असते याचा अभ्यास आधुनिक भूगोलात होतो.

**5. अलेक्झाडंर-**

'' पृथ्वीच्या पृष्ठभागावरील संपत्तीचे उत्पादन विनिमय व उपभोग यांचा अभ्यास म्हणजे आर्थिक भूगोल होय.

**6. डडले स्टॅम्प -**

ज्या भौगोलिक व इतर घटकांचा मानवाच्या उत्पादकतेवर परिणाम होतो. त्यांचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे आर्थिक भूगोल होय.

**7. हंटिगटन-**

ज्या घटकाच्या अनुषंगाने मानवाचा जीवनक्रम चालतो त्याचा अभ्यास म्हणजे आर्थिक भूगोल होय.

## आर्थिक भूगोलाचे स्वरूप-

1.वर्णनात्मक

2.कार्यकारणभाव

3.परिवर्तनशिल (गतिशील )

**1.वर्णनात्मक स्वरूप** -पुर्वीच्या काळात भूगोलाचा अभ्यास ज्याप्रमाणे वर्णनात्मक पदधतीने होत असेल. असा आर्थिक भूगोलाचा अभ्यास देखिल सुर्वातिच्या काळात वर्णनात्मक पदधतीने होत असे उदा. जंगले प्राणी पीके खनिजे उदयोगधंदे दळणवळण व्यापार इ. आर्थिक भूगोलाशी संबंधित असलेल्या विषयांचा अभ्यास वर्णनात्मक पदधतीने होत असे म्हणून त्याचे स्वरूप वर्नणात्मक होते.

**2 कार्यकारण भाव स्वरूप -** आर्थिक भूगोल हे शास्त्र असल्याने आर्थिक भूगोलातील निरनिराळया विषयांचा अभ्यास शास्त्रशुदध पदधतीने होणे आवश्यक आहे. कारण केवळ वर्णनावरून या विषयातील कोणतीही गोष्ट का व कशी घडते. याची कारण मिमांनसा झाली पाहिजे.

उदा. मनुष्य आपल्या गरजांच्या पुर्ततेकरीता काही आर्थिक क्रिया करतो यानांच मानवी व्यवसाय असे म्हणतात. यामध्ये शिकार मासेमारी पशुपालन शेती, लाकुड, कटाई, खाणकाम, कारखानदारी, वाहतूक व्यापार इ. व्यवसायाचा समावेश होतो. याव्यवसायादवारे मनुष्य आपल्या गरजा भागवतो परंतू जगाच्या निरनिराळया भागातील लोकांना एकाच प्रकारचे व्यवसाय करता येत नाहीत . कारण मानवाचे व्यावसाय त्या भागातील उपलब्ध साधनसंपत्ती आणि तेथिल प्राकृतिक व आर्थिक परिस्थितीवर अवलंबुन असतात. जेथे ही परिस्थती प्रतिकुल असते तेथे माववी व्यवसायांचा विकास होत नाही म्हणून कोणत्याही प्रदेशातील मानवी व्यवसायांशी संबंधीत असलेल्या अनुकुल व प्रतिकुल परिस्थितीची कारण मिमांनसा करावी लागते. या प्रकारे आर्थिक भूगोल हे या विषयातील निरनिराळया गोष्टींचा शोध घेणारे शास्त्र आहे यावरून आर्थिक भूगोलाचे कार्यकारण भाव स्वरूप (वैज्ञानिक/शास्त्रीय ) स्पष्ट होते.

**3. परिवर्तनशिल (गतिशील ) स्वरूप -**

आर्थिक भूगोलात ज्या विषयांचे अध्ययन होते. त्यांच्या प्रगतीचा आढावा घेतल्यास त्यात पूर्वीपासुन आजपर्यंत बदल होत असलेले दिसून येतात. व्यवसाय, वाहतुकीची साधने व व्यापार हे आर्थिक भूगोलाचे मुख्य विषय आहेत. मानवाला आपल्या गरजा भागवण्यासाठी निरनिराळे व्यवसाय करावे लागतात. यामध्ये शिकार मासेमारी शेती, लाकूड कटाई, खाणकाम, मोठे उदयोग, कारखाने इ. व्यवसाय समाविष्ठ आहेत. याव्यवसायांचे पूर्वीचे व आत्ताचे स्वरूप यामद्ये खूप फरक आहे.

पुर्वी शिकार उदरनिर्वाहासाठी होत असे मध्यंतरी त्यास व्यापारी स्वरूप आले होते. आत्ता त्यावर निर्बंध आले आहेत. पूर्वी मासेमारी फक्त गुजराण करण्यासाठी होत असे. आत्ता मासेमारी व्यापारी व अध्ययावत पदधतीने होत आहे. पुर्वी केवळ चरितासाठी होणारे पशुपालन आता मांस, लोकर, दुध यांच्या निर्यातीसाठी होत आहे. पुर्वी लाकुड कटाई साध्या पदधतीने होत होती आता लाकूड कटाईसाठी यंत्राचा वापर होत आहे. शेतीमध्ये आत्ता संकरीत बियाने, रासायनिक खते किटकनाशके व यंत्रसामूग्रीचा वापर होत असुन शेतीलाही व्यापारी स्वरूप आले आहे. औदयागिक क्षेत्रातही मानवाने खुप प्रगती केली आहे. वाहतूकीच्या साधनात तर मानवाने आश्चर्यकारक प्रगती केली असुन व्यापारही दुर दुरच्या देशामध्ये होत आहे.

## आर्थिक भूगोलाची व्याप्ती-

प्रत्येक विषयाचे एक स्वतंत्र असे क्षेत्र असते त्याचप्रमाणे आर्थिक भूगोलाचे स्व:ताचे काही विषय आहेत. आणि त्याचा अभ्यास त्यामध्ये होतो  हा अभ्यास 3 दृष्टीने होतो.

1.आर्थिक भूगोल हे साधनसंपत्तीचा अभ्यास करणारे शास्त्र आहे जे मानवाच्या उपजीविकेचे साधन आहे.

2.आर्थिक भूगोलात मानवी जीवन त्यांच्या व्यवसायावर परिणाम करणा-या प्राकृतिक व सांस्कृतिक घटकांचा अभ्यास होतो.

3.आर्थिक भूगोल हे शेती खनिजे उत्पादन व्यापार व वाहतुक यांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे.

अशा प्रकारे साधनसंपत्ती आणि तिच्याशी संबंधीत मानवी व्यवसायांचा आर्थिक भूगोलामध्ये अभ्यास होतो. हेच आर्थिक भूगोलाचे मुख्य विषय आहेत. या दृष्टिने निसर्गाच्या मर्यादा लक्षात घेवुन उपलब्ध संपत्ती साधनांचा विकास करण्याच्या पदधतीचा अभ्यास ही आर्थिक भूगोलाची योग्य व्याप्ती आहे. आर्थिक भूगोल हे मानवाच्या उत्पादक व्यवसायांचा अभ्यास करणारे विशिष्ट प्रदेशात सांधनसंपत्तीचा का विकास झाला आणि काही प्रदेशात का नाही झाला हे स्पष्ट करणारे शास्त्र आहे. म्हणून आर्थिक भूगोलात मानवाचा पूढाकार आणि नै.घटक यांचा उत्पादनावर व मानवाच्या जीवनावर झालेल्या परिणामांच्या अभ्यासावर भर दिला जातो. आर्थिक भूगोल हे सध्या असलेल्या उत्पादीत व्यवसायांचे स्वरूप असून वाढते ज्ञान तंत्र कला यामुळे साधनसंपत्तीच्या वैश्वीक परिवर्तनाचे  अध्ययन नसून सामाजिक व राजकीय हेतू बदलांचे ही अध्ययन आहे. हे केवळ विविध नै. घटनाकडे पाहणारे शास्त्र नसुन यामध्ये वांशिक पदधती, परंपरा आदी झालेली सुरवात भांडवल उपलब्धता, मजूर, वाहतूक, ज्ञानतंत्र, शासकीय स्थिरता यांचा विचार करणारे शास्त्र आहे.

जगातील कोणताही देश प्रदेश स्वयंपूर्ण नाही यातुनच व्यापाराची निर्मिती झाली. आर्थिक भूगोलामध्ये देशादेशाच्या व्यापाराचा अभ्यास होतो.

आज जगात साधन संपत्तीचा मोठया प्रमाणात वापर आणि उदयोगधंदे वाहतूक व व्यापार यांची मोठया प्रमाणात प्रगती झालेली आहे त्यामूळे जगात आर्थिक साधनसंपत्तीच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत या गोष्टींचा विचार करता आर्थिक भूगोलाच्या अध्ययनाने साधनसंपत्तीच्या तर्कशुदध नियमबध्द शास्त्रीय व दीर्घकालीन व्यापाराची दिशा मिळते.

हंबोल्ट यांच्या मते पृथ्वीवर अमर्याद साधनसंपत्ती आहे जी मानवाच्या कल्याणासाठी आहे म्हणून याचा विचारपूर्वक उपयोग झाला पाहिजे हे आर्थिक भूगालोच्या अभ्यासाने साध्य होते.

मॅक कार्ट यांच्या मते आर्थिक समस्या आर्थिक भूगालोच्या अध्ययाने दूर होवू शकतात याच उददेषाने याचा अभ्यास होवू शकतो.

अशा प्रकारे आर्थिक भूगोल हा एक व्यापक विषय असल्याने त्याची व्याप्ती विशाल आहे. याचे क्षेत्र फार मोठे आहे.

## १.२ आर्थिक क्रिया संकल्पना व वर्गीकरण

**प्रस्तावना-**

मानव उपलब्ध नै. परिस्थितीत विविध कार्य करून आपली उपजीवीका करत असतो. मानवाला उपजीवीकेसाठी काही करावे लागतात त्यालाच व्यवसाय असे म्हणतात.

मानवाचा निसर्गाशी जसजसा अधिक संबंध येऊ लागला. त्याचे ज्ञान व अनुभव जसजसे वाढू लागले तसतसे त्याने विविध प्रकारचे उदयोग व्यवसाय सूरू केले. मानवी संस्कृतीचा इतिहास हा अशाच प्रकारच्या उदयोगधंदयाचा विकास होय. शिकार करणे, फळे व कंदमुळे गोळा करणे, मासेमारी, पशूपालन, खाणकाम, शेती हे निसर्गदत्त व्यवसाय तो प्रथम करू लागला. पुढे पुढे वस्तूवर काही प्रक्रीया करून त्यांची उपयागिता वाढविण्याचे उदयोग सुरू झाले यातुनच निर्मिती किंवा कारखानदारी याचा जन्म झाला. वस्तुंचे उत्पादन जस जसे अधिक आणि नित्य होऊ लागले. तस तसा व्यापार, वाहतूक दळणवळण या व्यसायास जोर येवू लागला त्यांच्या वाढीबरोबर या व्यवसायास लागणारे तंत्रज्ञान, व्यवस्थापन यांसबधी सल्ला देणारा एक मोठा बुद्दिजीवी वर्ग सर्वत्र वाढू लागला.हे सर्व व्यवसाय जगाच्या सर्व भागात कमी अधिक प्रमाणात होत गेले नै.परिस्थिती आणि आर्थिक विकास यानुसार या व्यवसायांची श्रेणी मात्र सर्वत्र भिन्न होती.

मानवाच्या या विविध व्यवसायचे वर्गीकरण वेगवेगळया प्रकारे करता येते. व्यवसायची श्रेणी हा घटक महत्त्वाचा धरल्यास मानवी व्यवसायांचे प्रमुख चार प्रकार पाडण्यात आले आहेत.

आर्थिक क्रिया (क्रिया व्यवसाय)

| प्राथमिक क्रिया | द्वितीयक क्रिया | तृतियक क्रिया | चतुर्थक क्रिया |
|---|---|---|---|
| 1.शिकार | 1.उदयोगधंदे | 1.व्यापार | 1. डाक्टर |
| 2.पशूपालन | 2.कारखानदारी | 2.वाहतूक व दळणवळण | 2. वकिल |
| 3.मासेमारी | | 3. बॅकिग | 3. प्राध्यापक |
| 4.शेती | | | 4. तज्ञ |
| 5.खाणकाम | | | 5.हशेबनीस |
| 6.लाकूडतोड | | | 6.इंजिनिअर |
| 7.फळे कंदमुळे गोळा करणे | | | 7.व्यवस्थापन |

**प्राथमिक क्रिया :** नै. संपत्तीवर आधारलेल्या कच्चा माल उपलब्ध करून देणा-या व्यवसायांना प्राथमिक क्रिया म्हणतात. या क्रियांमधून उत्पादने निसर्गानून जषीच्या तषी उपलब्ध करून जातात या क्रियांमध्ये मानवाचा नै. घटकांशी थेट संबध येत असतो.

**1.शिकार** -सूमारे 12000 वर्षापूर्वी मानव हा शिकार, फळे कंदमुळे गोळा करून जगत होता अत्यंत अप्रगत भागात विशेषता विषुववृत्तीय जंगलातील वन्य जमाती व टुड्रा प्रद्शातील अत्यंत मूश्कील प्रतिकुल पर्यावरणात

एस्किमो लोक आजही शिकार करून आपला उदरनिर्वाह करतात. हल्ली शिकारीचा व्यवसाय संपूष्टात येवू लागला आहे कारण वन्य प्राण्याची शिकार करणे कायदयाने गुन्हा आहे.

**2.पशूपालन -** हा प्राथमिक व्यवसाय ओसाड निमओसाड प्रदेशात मोठया प्रमाणावर चालतो उंट ,शेळया, मेंढया,घोडे, रेंनडियर हे प्राणि दुध ,मांस, कातडी ,लोकर हाडे यासारखे पदार्थ प्राप्त करण्यासाठी पाळले जातात पाळलेल्या प्रांण्याचे मूख्य खादय गवत असल्याने गवताळ प्रदेषात प्राण्यांच्या खादयांच्या शोधात पशूपालकानाही भटके जीवन जगावे लागते.

**3.मासेमारी -** निरनिराळया देशाच्या किनारपटटीवर सागरभागात व नदया, सरोवरे तलाव यामध्ये मासेमारी हा व्यवसाय केला जातो उष्ण व शीत कटिबंधात बहूदा हा व्यवसाय उदरनिर्वाह म्हणुन चालतो तर समशितोष्ण देशात अटंलाटीक व प्रशांत महासागरात हा व्यवसाय व्यापारी तत्वावर चालतो नै. खोल बंदराची पाश्वभुमी माशांच्या विविध जाती असणारी ठिकाणे मासेमारी व्यवसायला आदर्श ठरली आहेत.

**4.शेती -**जगातील निम्यापेक्षा जास्त लोक या प्रा. व्यवसायात गुतंलेले आहेत या व्यवसायावर हवामान, मृदा, प्राकृतिक रचना या घटकांचे मोठे प्रभुत्व असते. नदयाची खोरी. त्रिभूज प्रदेश, गाळाची मैदाने शेतीला पोषक ठरत असल्याने प्राचीन मानवी संस्कृतीचा उगम याच प्रा. व्यवसायमूळे झाला आहे. भारतासारख्या विकसनशिल देशात सूमारे 78 टक्के लोक ,शेतीत व्यस्त आहेत.

**5.खाणकाम -** खनिजे ही निसर्गाने विशिष्ठ क्षेत्रातच प्रधान केलेली अतिशय मोलाची संपदा आहे खनिजांचे वितरण प्रदेशावर अवलंबून असते. औदयागिक क्रांतीनंतर खाणकाम या व्यवसायाला फार मोठे महत्त्व प्राप्त झाले कारण कारखानदारीसाठी लागणारा कच्चा माल खाणकामातूनच उपलब्ध होतो या व्यवसायामूळेच वाहतूक व्यवसायाला चालना मिळते नंतर तृतियक व चतृर्थक व्यवसाय विकसित होतात.

**6.लाकूड तोड -**हा प्राथमिक व्यवसाय अरण्यावर अवलंबून असतो सुचीपर्णी अरण्यात लाकुडतोडीचा व्यवसाय मात्र प्रगत स्वरूपाचा आहे. कॅनडा स्वीडन, नार्वे, सैबेरिया थिनलॅड येथे व्यापारी तत्त्वावर लाकूड तोडीचा व्यवसाय करतात कारण हे देश प्रगत असून कागदा तयार करण्यासाठी लागणारा लगदा यासाठी वृक्षतोड करतात.

**7.फळे कंदमूळे गोळा करणे-** भारतात सहयाद्री निलगीरी व हिमालयाच्या वनक्षेत्रात अजुनही हे प्राथमिक व्यवसाय आदिवासी लोक करतात डिंक, लाख, मध, मेण, पाने, फळे, औषधी वनस्पती गोळा करून बाजारात नेवून विकतात आणि स्व:ताचा उदरनिर्वाह करतात.

**द्वितीयक क्रिया -** ज्यांचा संबध प्रक्रिया निर्मिती व पक्क्या मालाच्या उत्पादनासी येतो असे उदयोग द्वितीयक श्रेणीचे उदयोग होत. प्राथमिक स्वरूपात उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीवर अनेक प्रक्रिया संसकरण करून उपयूक्त वस्तुची निर्मिती केली जाते प्राथमिक श्रेणीच्या व्यवसाय उत्पादनातूनच द्वितीयक श्रेणीचे व्यवसाय निर्माण झाले. शेती या प्राथमिक व्यवसायतून मिळणा-या कापसापासून कापड तयार करणे म्हणजे द्वितीयक श्रेणीचा व्यवसाय होय. प्राथमिक व्यवसायातुन मिळणा-या पदार्थातुन बदल घडवुन प्रक्रिया करून त्यांच्या पासुन आधिक उपयूक्त व मौल्यीक टिकावू पदार्थ तयार केले जातात. कच्चा पदार्थावर प्रक्रिया करून पक्के पदार्थ माल तयार करण्याच्या व्यवसायालाच कारखानदारी असे म्हणतात.

उदयोगधंदयात प्राथमिक व्यवसायतुन कच्चा माल मिळवून तंत्र यंत्र कौशल्य मानवी बळांचा वापर केला जातो व विविध वस्तू किंवा उत्पादने मिळविली जातात. द्वितीयक श्रेणीचे व्यवसाय ऐखादया देशाच्या आर्थिक विकासाला जबरदस्त प्रेरक ठरतात. यूरोपात औदयोगिक क्रातींचे यूग आल्यावर ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स यासारख्या देशांची अल्फावदीत भरघोस प्रगती झाली. संयूक्त संस्थाने व रशिया मध्ये खनिजांची भरपुर उपलब्धता असल्यामुळे उदयोधंदयाचे प्रमाण जास्त असून व्यापाराची भरभराट झाली आहे हे देश जगात अग्रेसर ठरले आहेत म्हणूनच द्वितीयक व्यवसायांना आर्थिक आणि व्यापारी प्रगतीचे प्रतिक असे म्हणतात. स्वातंत्र प्राप्तीनंतर भारतात कारखानदारीची विकास झाल्याने आंतरराष्ट्रीय व्यापारातील भारताचे स्थान उंचावले आहे.

**तृतीयक क्रिया -** कोणत्याही प्रकारच्या उत्पादनांचा व सेवेंचा आर्थिक विकासाला व समाज सेवेला उपयोग व्हावा सेवेचे व उत्पादनाचे मूल्य, मोल वाढावे या उद्देशाने केल्या जाणा-या व्यवसायांना तृतीयक क्रिया असे म्हणतात. व्यापार, वाहतूक, गोदाम, गुदामे, उपहारगृहे यांच्यामधील लोकांचे तसेच पोस्ट, शासन, कारखाने, सहकारी संस्था, घरकाम यांच्यात सेवा कार्य करणा-या लोकांचे श्रम तृतीयक क्रियांमध्ये समाविष्ठ केले जाते.

वाहतूकीला आर्थिक विकासाची जीवनरेषा असे म्हणतात. संयुक्त संस्थानात सरोवरांचा सागरी वाहतुकीसाठी भरपुर लाभ उठवण्यात आला आहे. भारतातील लोहमार्गाचे जाळे आशियात अग्रेसर आहेत. नागरी व ग्रामीण क्षेत्रांना जवळ असणारा हा व्यवसाय व्यापारी उलाढालींना पोषक ठरतो. कोकणामध्ये तयार झालेला कोकण रेल्वेचा लोह मार्ग तेथील मागास प्रदेशाचा कायापालट होण्याला कारणीभुत ठरला आहे. व्यापार अंतर्गत व परराष्ट्रीय अशा दोन प्रकारचा असतो. संपदा व वस्तू उत्पादनातील तफावत व्यापाराला चालना देते व्यापारावरही भौगोलिक आर्थिक व सांस्कृतिक घटकांचे मोठे स्वामीत्व असते. लोकसंख्या, कौशल्य, वैज्ञानिक प्रगती, आंतरराष्ट्रीय संबंध, वाहतूक यावर व्यापार अवलंबुन असतो. अशा प्रकारे मानवी व्यवसायाच्या प्रकारामध्ये तृतीयक क्रियेचे व्यवसाय अनन्य साधारण महत्त्वाचे मानले जातात.

**चतुर्थक क्रिया -** ज्या क्रिया शिक्षणावर, उच्च ज्ञानावर, माहिती तंत्रज्ञान, संशोधन व विकास, बौदधीक क्षमता यांच्यावर आधारलेल्या असतात अशा कुशल व मौल्यवान सेवा क्रियांना चतुर्थक क्रिया म्हणतात. या सेवा मात्र बौदधीक व खाजगी स्वरूपाच्या आहेत.

उदा. डॉक्टर, प्राध्यापक,तज्ञ ,हिशेबनिस,इंजिनियर,व्यवस्थापक इ... व्यवसायिक लोक या गटात मोडतात चतुर्थक श्रेणीच्या व्यवसायांचे महत्त्व द्वितीयक आणि तृतीयक श्रेणीच्या व्यवसायापेक्षा अधिक आहे. या चतुर्थक सेवात गुंतलेले लोकच वेगवेळया ठिकाणच्या नै. परिस्थितींचा अशा रितीने उपभोग घेता येईल हे दाखवुन त्याबाबत मार्गदर्शन करतात. मानवाची आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रगती या व्यवसायामुळेच होते.

## १.३ आर्थिक भूगोलाच्या शाखा -

आर्थिक भूगोल ही मानवी भूगोलाची प्रमूख शाखा आहे. यामध्ये साधनसंपत्ती शेती, उदयोगधदे, वाहतुक, व्यापार इ. विषयांचा समावेश होतो. आर्थिक भूगोलाच्या काही महत्वाच्या शाखा पूढीलप्रमाणे.

## आर्थिक भूगोलाच्या शाखा

१. साधनसंपत्ती भूगोल २. व्यापार भूगोल
३. कृषीभूगोल ४. वाहतूक भूगोल
५. औदयोगिक भूगोल

**1. साधनसंपत्ती भूगोल -** भुतलावर विविध साधनसंपत्ती आढळते यामध्ये जल, वन, पशू, मृदा, खनिजे, उर्जा इ. साधनसंपत्तीचा समावेश होतो. साधनसंपत्तीचे प्रकार, निर्मिती, महत्त्व, वितरण इ. अभ्यास साधनसंपत्ती भूगोल या शाखेत होतो. पृथ्वीवरिल साधनसंपत्तीचा मानवाला वेगवेगळया प्रकारे उपयोग आहे. मानवाचे जीवन साधनसंपत्तीवर अवलंबून आहे. या दृष्टीने साधनसंपत्तीचा अभ्यास महत्त्वपूर्ण आहे.

**2. कृषी भूगोल -** शेती या प्राथमिक व्यवसायातुन मानवाला अन्नधान्य व कच्चा माल मिळतो. हा व्यवसाय मृदा हवामान जलसिंचन या घटकावर अवलंबून असतो. जगात या घटकांनूसार अन्न धान्य, कच्चा माल, फळ, भाजी पाला इ. उत्पादन होते. या सर्व घटकांचे अध्ययन कृषी भूगोल किंवा शेती भूगोल या शाखेमध्ये केले जाते.

**3. औदयोगिक भूगोल -** उदयोगधंदयाचा समावेश द्वितीयक व्यवसायात होतो. यामध्ये मोठे लघु कुटीर उदयोगांचा समावेश होतो. लोहपोलाद, ॲल्यूमिनिअम, स्वयंचलित वाहन उदयोग, कच्चा माल, उर्जा साधने, मजुराचा पुरवठा, वाहतुक, बाजारपेठ, तांत्रिक ज्ञान यावर अवलबूंन आहे. ज्या देशात उदयोगधंदयाचा विकास होतो. तो देश प्रगत समजला जातो. अशा विविध उदयोग धंदयाचा व त्यांच्यावर परिणाम करणा-या सर्व घटकांचा अभ्यास औदयोगिक भूगोल या शाखेत होतो.

**4. वाहतूक भूगोल** – स्थलमार्ग रस्ते व रेल्वेमार्ग, जलमार्ग व हवाईमार्ग हे वाहतूकीचे महत्त्वाचे मार्ग आहेत. प्रवासी व मालाच्या वाहतूकीसाठी वाहतूकीची साधने महत्त्वाची असतात. देशात खाणकाम, शेती उदयोधंदे शहरे व्यापाराची प्रगती व पर्यटनाचा विकास वाहतुकींच्या मार्गावर अवलबूंन असतो. शिवाय नै. आपत्ती, यूदध इ. वेळी त्यानां विशेष महत्त्व प्राप्त होते. म्हणून वाहतुकीच्या मार्गाचा अभ्यास महत्त्वपुर्ण असतो आणि हा अभ्यास वाहतुक भूगोलात होतो.

**5. व्यापारी भूगोल-** नै. परिस्थितीच्या भिन्नतेमुळे व्यापाराची निर्मिती होते. नै. परिस्थिती आणि निरनिराळी उत्पादने सर्वत्र सारखी असत नाहीत त्यामुळे जगातील कोणताही प्रदेश स्वंवपूर्ण नाही. परिणामी एका प्रदेशाला दुसऱ्या प्रदेशावर अवलबूंन राहावे लागते म्हणून व्यापार निर्माण होतो. आज जगात व्यापारी संघटना झाल्या आहेत त्यामूळे जगातील व्यापाराला खुप महत्त्व प्राप्त झाले आहे.

## १.४ आर्थिक भूगोलाच्या अध्ययनाचे महत्त्व

आर्थिक भूगोल ही मानवी भूगोलाची एक प्रमुख महत्त्वाची शाखा आहे. यात साधनसंपत्ती आणि मानवाच्या आर्थिक क्रियांचा अभ्यास होतो. जमीन, पाणी, जंगले, प्राणी आणि खनिजे ही महत्त्वाची संपत्तीसाधने आहेत. यांवर मानवाच्या आर्थिक क्रिया अवलंबून आहेत. मासेमारी, पशुपालन, शेती, लाकूडकटाई, खाणकाम,

कारखानदारी, दळणवळण व व्यापार ह्या मानवाच्या आर्थिक क्रिया आहेत.

कोणत्याही देशातील साधनसंपत्तीवरून त्या देशाच्या समृद्धतेची कल्पना येते; तसेच त्या देशातील निरनिराळया आर्थिक क्रियांच्या प्रगतीवरून त्या देशाच्या आर्थिक विकासाची माहिती मिळते. शेती, खाणकाम, कारखानदारी हे महत्त्वाचे व्यवसाय आहेत. देशातील दळणवळणावर सर्व गोष्टींचा विकास अवलंबून असतो. देशाच्या निर्यात व्यापाराच्या स्थितीवरूनदेखील त्या देशाच्या विकासाची स्थिती समजते. आर्थिक भूगोलात वरील गोष्टींचे अध्ययन होते; त्यामुळे आर्थिक भूगोलावरून कोणत्याही देशाच्या विकासाचे व मागासलेपणाचे चित्र स्पष्ट होते; त्यामुळे आर्थिक भूगोलाचे अध्ययन महत्त्वाचे आहे.